SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX - 2609000, www.unishivaji.ac.in,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - 416 004,
राष्ट्रीय सेवा योजना
Phone - (0231) 2609176
Email: nss@unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

दि. २२/०९/२०२५

संदर्भ जा.क./शिवाजी वि./रा.से.यो./१३६१

प्रति,

मा. श्री. गणेश लवंगारे,
रासेयो कार्यक्रम अधिकारी,
राजर्षी छत्रपती शाहू, महाविद्यालय, कोल्हापूर

विषय: NRD/SRD प्रजासत्ताक दिन पथसंचलन वार्षिक निवड चाचणी कार्यक्रमास अनुसरून गठित करण्यात आलेल्या समितीमध्ये सन्माननीय समिती सदस्य म्हणून झालेल्या निवडीबाबत...

महोदय/महोदया,

शासन निर्देशान्वयें सन २०२५-२६ या वर्षात महाविद्यालयीन व विद्यापीठ स्तरावर राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन NRD/SRD प्रजासत्ताक दिन संचलन निवड चाचणी आयोजित करणेसह सन २०२५-२६ वर्षातील विविध जिल्हा, विद्यापीठ, राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावरील विविध शिबीर, कार्यकमांकरींता एकत्रित वार्षिक निवड चाचणी कार्यकमाचे आयोजन करण्यात येत आहे. सदर शिबीरामध्ये प्रतिवर्षीप्रमाणे कोल्हापूर, सांगली, सातारा या तीन जिल्हयातील विद्यार्थी व विद्यार्थीनी सहभागी होणार आहेत. याबाबत दिनांक २३ सप्टेंबर, २०२५ रोजी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृह येथे सदर वार्षिक निवड चाचणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

**मा. कुलगुरूसो यांचे निर्देशानुसार सदर निवड चाचणी कार्यक्रमाकरिता गठित करण्यात आलेल्या निवड समितीमध्ये आपली सन्माननीय निवड समिती सदस्य' म्हणून निवड झालेली आहे. त्याबद्दल विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने आपले मन:पुर्वक अभिनंदन !**

सदर पत्राव्दारे आपणांस कळविणेत येते की, सदर NRD/SRD राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन संघ निवड व वार्षिक निवड चाचणी कार्यकमास आपण वरीलप्रमाणे नमूद तारीख व ठिकाणी उपस्थित रहावेत ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ. टी. एम. चौगले)
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA**
**PHONE : EPABX – 2609000**
**www.unishivaji.ac.in**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004, महाराष्ट्र
**NATIONAL SERVICE SCHEME**
दूरध्वनी **0231-2609176**
ई–मेल आयडी –**nss@unishivaji.ac.in**

संदर्भ.जा.क्र./शिवाजी वि./रा.से.यो./ १३६९ दिनांक २४/०९/२०२५

प्रति,
**मा. डॉ. गणेश मारूती लवंगारे,**
**राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज,**
**कोल्हापूर**

## आभारपत्र

महोदय,

राष्ट्रीय सेवा योजनाद्वारे वेळोवेळी विविध विद्यार्थीकेंद्रीत व समाजाभिमूख उपक्रम, कार्यक्रम राबविण्यात येतात. सन २०२५–२६ वर्षातील राज्य, राष्ट्रीय स्तरावरील याचबरोबर वेळोवेळी आयोजित जिल्हा, विद्यापीठ स्तरावरील विविध शिबीरे तसेच कार्यक्रम, उपक्रमातील प्रस्तावित सहभाग निवडीकरीता विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्षाद्वारे दिनांक २३ सप्टेंबर, २०२५ रोजी एकत्रित निवड शिबीराचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर सन २०२५–२६ वार्षिक निवड चाचणी शिबीरास अनुसरून आपण दिनांक २३ सप्टेंबर, २०२५ रोजी राजमाता जिजाउसाहेब बहुद्देशीय सभागृह, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे निवड चाचणी आमंत्रित सदस्य म्हणून पुर्ण वेळ उपस्थित राहून निवड चाचणीचे यशस्वीरित्या आयोजनास अनुसरून आवश्यक सहकार्य केलेले आहे. त्याबद्दल विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने आपले मन:पुर्वक आभार.

भविष्यातदेखील राष्ट्रीय सेवा योजना विषयक विविध कार्यक्रम, उपक्रमांमध्ये आपले योगदान, व सहकार्य असेच वृध्दींगत होवो.

**कळावे,**

**विशेष आभारासह...**

आपला विश्वासू,

(डॉ. व्ही. एम. चौगले)
संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना